MHPU170007092024

**<u>ईतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र १००/२०२४ मधील नि. क्र.१ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज तपासी अंमलदार यांनी दोषारोपपत्र दाखल करण्यास झालेला ९ महिने व १३ दिवसांचा विलंब माफ होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तपासी अंमलदार यांनी असे कथन केले आहे की, दरम्यानच्या काळात त्यांना दोन वेळेस कोरोना हा आजार व एक वेळेस डेंग्यू आणि गुढघेदुखी हा आजार झाल्याने तसेच त्यांच्या मुलाचा अपघात झाल्याने त्यांची शारीरीक व मानिसक स्थिती ठिक नव्हती. त्यामुळे प्रस्तुत दोषारोपपत्र दाखल करण्यास ३ वर्षे ५ महिने व २८ दिवसांचा विलंब झालेला आहे.

०२. आरोपीस नोटीस पाठवूनही तो प्रस्तुत प्रकरणात हजर झाला नाही व म्हणणे दाखल केले नाही.

०३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४७३ अन्वये मुदत मर्यादा संपल्यानंतर एखाद्या अपराधाची दखल घ्यावयाची झाल्यास, विलंबाचे योग्यप्रकारे स्पष्टीकरण देण्यात आले किंवा न्यायहितार्थ तशी दखल घेणे जरुरीचे आहे याबाबत न्यायालयाचे समाधान झाले तर सदर न्यायालयास अपराधाची दखल घेता येईल. प्रस्तुत अर्जातील कथने पाहता, मी या मताचा आहे की, दोषारोपपत्र दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे समधानकारक स्पष्टीकरण तपासी अंमलदार यांनी दिलेले आहे. तसेच, प्रस्तुत अपराधाची तपासी अंमलदार यांच्या समाधानकारक स्पष्टीकरण असलेल्या चूकीतून झालेल्या विलंबामुळे दखल न घेतल्यास फिर्यादीवर अन्याय होईल असे दिसून येते. त्यामुळे सदर अपराधाची दखल घेणे न्यायहितार्थ जरुरीचे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेशः–

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज निशाणी १ मंजूर करण्यात येतो व दोषारोपपत्र दाखल करण्यास झालेला ९ महिने व १३ दिवसांचा दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

०२. प्रस्तुतचे प्रकरण संक्षिप्त फौजदारी खटला या सदरी नोंदविण्यात यावे व प्रकरणाची तारीख **दि.१०/११/२०२५** ठेवण्यात यावी.

०३ प्रस्तुत अर्ज निकाली करण्यात येतो.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT Date: 2025.08.26 13:07:52 +0530

ठिकाणः– इंदापूर.
दि.२६/०८/२०२५

(प्र. चं. बारटक्के )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर
ता. इंदापूर जि.पुणे.